# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अकोला
दिनांकः— ०२/०३/२०२६

| | | |
|---|---|---|
| १ | युनिट चे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुद्दा व कार्यालयाचा पत्ता. | आरोपी लोकसेवक श्री छगनलाल लथ्थु सुरजे, वय ५६ वर्ष, पद— कार्यालयीन सहायक, वर्ग —३, कार्यालय — महात्मा फुले, मागास वर्ग, विकास महामंडळ, मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भवन, निमवाडी अकोला जि. अकोला, रा. जुनी वस्ती कांडली, अंबाळा रोड, परतवाडा, ता. अचलपुर, जि. अमरावती |
| ३ | घटना तारीख वेळ | दिनांक ०२.०३.२०२६ चे १२.४० ते १३.२७ वा. |
| ४ | मागणी केलेली लाच रक्कम | ५००/— रू |
| ५ | स्विकारलेली लाच रक्कम | ५००/— रू |
| ६ | घटनास्थळ | महात्मा फुले, मागास वर्ग, विकास महामंडळ मर्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भवन, निमवाडी अकोला जि. अकोला, |

थोडक्यात हकिकत :—

यातील तक्रारदार यांनी ला.प्र.वि. अकोला येथे दि. २३.०२.२०२६ तक्रार नोंदविली की, ''महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ (मर्या.) मुंबई'' अंतर्गत शासनाकडुन शेळी पालन करण्याकरीता कर्ज मंजुर करण्यात येते. त्याअनुषंगाने मा पत्नीचे नांवे विशेष घटक बिजभांडवल योजने अंतर्गत शेळी पालन करण्याकरीता रू. २,५०,०००/— कर्ज मंजुर करण्याकरीता महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या, जिल्हा कार्यालय अकोला येथे गेलो होतो. त्यावेळी मला त्याठिकाणी श्री. सुरजे, लिपीक, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या, अकोला हे भेटले व ते मला म्हणाले की, सदर प्रकरणात त्रुटी असुन त्यामधील त्रुटी पुर्तता करून घेवून या, तसेच मी तुम्हाला या योजनेअंतर्गत सदर कर्ज मंजुर होण्याकरीता मदत करतो, त्याकरीता मला ५००/—रू. लागतील. त्यावर मी त्यांना 'साहेब ऐवढे पैसे कश्याचे लागतात' असे विचारले असता, त्यांनी मला सांगीतले की, ५००/— रूपये दिल्याशिवाय तुमचे काम होणार नाही. त्यावर मी त्यांना नाईलाजास्तव ठिक आहे त्रुटी पुर्तता करून परत येतो असे म्हणुन निघुन आलो. परंतु तक्रारदार यांची लाच देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने दि. २३.०२.२०२६ रोजी ला.प्र.वि. अकोला येथे आरोपी विरूध्द तक्रार दिली.

सदर तक्रारीवरुन दिनांक २३.०२.२०२६ रोजी महात्मा फुले विकास महामंडळ, मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भवन, निमवाडी अकोला जि. अकोला येथे लाच मागणी पडताळणी करण्यात आली. सदर लाच मागणी पडताळणी कार्यवाही दरम्यान आरोपीने तक्रारदार यांना स्वतःच्या आर्थिक फायदयाकरीता शासकीय पंचासमक्ष रू. ५००/— ची मागणी केली. त्यावरून दिनांक ०२.०३.२०२६ रोजी सापळा कार्यवाही आजमावली असता आरोपीने तक्रारदाराकडुन रू. ५००/— लाचरक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन खदान जि. अकोला येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदर कार्यवाही मा. श्री. बापु बांगर, पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९०११३२३४२६), मा. श्री. सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती (९७६४२१०४८५), मा. श्री. मिलींदकुमार अ. बहाकर, पोलीस उपअधिक्षक, अकोला (९१५८८२२६७६) यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. प्रविण वेरूळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. अकोला यांचे सोबत पोनि. अतुल इंगोले, पोलीस हवालदार अमोल भांड, अविनाश पाचपोर, पो.अ. असलम शेख, गोपाल किरडे, संदिप ताले, चालक पोहवा सलीम खान, सर्व ला. प्र.वि. अकोला यांनी पार पाडली.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी/लोकसेवक अथवा त्यांच्यावतीने कोणत्याही खाजगी इसमाने त्यांचे कोणतही शासकीय काम करून देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, अकोला येथील खालील क्रमांवर संपर्क साधावा.

ऑफिस फोन नं. ०७२४—२४१५३७०, टोल फ्रि क्रमांक— १०६४
मोबाईल क्र. ९४०३८०१०६४

(प्रविण वेरूळकर) ०२/०३/२६
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अकोला

अॅन्टी करप्शन ब्युरो
अकोला